# प्रकरण ३ रे

# रेंदाळ गावात जलस्वराज्य प्रकल्पातून राबविलेले उपक्रम

३.१ प्रस्तावना

३.२ जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी अस्तित्वातील पाणीपुरवठा सुविधांची माहिती

३.३ रेंदाळ गावची पार्श्वभूमी

३.४ जलस्वराज्य प्रकल्पातील पाणीपुरवठा सुविधांची माहिती

३.५ रेंदाळमधील जलस्वराज्य प्रकल्प

३.६ रेंदाळला जलस्वराज्य प्रकल्पातंर्गत मंजूर झालेला निधी

३.७ रेंदाळने जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून राबविलेले उपक्रम

३.८ रेंदाळने राबविलेल्या उपक्रमांचे फायदे

३.९ समारोप

संदर्भसूची

# प्रकरण तिसरे

# रेंदाळ गावात जलस्वराज्य प्रकल्पातून राबविलेले उपक्रम

## ३.१ प्रस्तावनाः

राष्ट्रपिता महात्मा गांधींचे स्वयंपूर्ण गावाचे स्वप्न होते. गांधीजींच्या स्वप्नातील स्वयंपूर्ण गाव प्रत्यक्षात आणण्यासाठी राज्य शासनाने २००२ मध्ये जलस्वराज्य प्रकल्प सुरु केला. जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण भागात लोकसहभागातून विकास, पारदर्शक कारभार आणि महिला सक्षमीकरण होणे अपेक्षित होते. हा प्रकल्प केवळ पाण्यासाठी नसून माणसांची मानसिकता बदलून त्यांना विकास प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी आहे. जलस्वराज्य प्रकल्प सर्व ग्रामपंचायतींमध्ये सुरु न करता तो मागणी आधारीत आहे. ग्रामपंचायतींनी अर्ज केल्यानंतर शासकीय निकष व नियमांप्रमाणे ज्या ग्रामपंचायती पात्र ठरतील त्या ग्रामपंचायतींमध्ये जलस्वराज्य प्रकल्प सुरु करण्यात आला. महाराष्ट्रात एकूण ३०४४ ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली. त्यापैकी कोल्हापूर जिल्हयातील हातकणंगले तालुक्यातील रेंदाळ हे एक गाव. रेंदाळने जलस्वराज्य प्रकल्पातून विकास कशा प्रकारे केला आहे याचा अभ्यास करणे हा या लघुप्रबंधाचा मुख्य उद्देश आहे. प्रस्तुत प्रकरणात रेंदाळने विकासासाठी जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून कोणते उपक्रम राबविले आहेत याचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. रेंदाळची पार्श्वभूमी, पूर्वीच्या पाणीपुरवठा सुविधांची माहिती, जलस्वराज्य प्रकल्पातून साकारलेली योजना, प्रकल्पादरम्यान राबविलेले उपक्रम व त्याद्वारे झालेला विकास यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

## ३.२ जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी अस्तित्वातील पाणीपुरवठा सुविधांची माहितीः

१)"१९७६ साली पट्टणकोडोली-हुपरी-रेंदाळ व इतर गांवासाठी कार्यान्वीत झालेल्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेत रेंदाळ, ता. हातकणंगले या गावचा समावेश होता. या प्रादेशिक नळपा णीपुरवठा योजनेच्या पंचक्रोशीत २००० नंतर चांदी उद्योग, हातमाग व्यवसाय तसेच पंचतारांकित औद्योगिक वसाहत या कारणांमुळे लोकसंख्या दरवाढ झपाटयाने झाली. सदर योजना ३० वर्षे



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

इतकी जुनी असलेने या योजनेची कार्यक्षमता कमी झालेली आहे. पाईप लाईन गळती, मशिनरी दुरूस्ती, पाणी चोरी तसेच प्रादेशिक योजनेतील गावांची झपाटयाने वाढलेली लोकसंख्या या कारणांमुळे या योजनेचे पाणी सर्वसाधारण १० दिवसातून एकदा असे अत्यल्प प्रमाणात मिळत होते. तसेच या योजनेतून लोकांना वैयक्तिक नळ कनेक्शन देण्यात आलेली नव्हती. सदर योजनेचे जलशुद्धीकरण केंद्र मौजे पट्टण कोडोली येथे असून हुपरी रेंदाळसाठीची शुद्ध पाण्याची टाकी मौजे हुपरी येथे आहे. या योजनेतील रेंदाळ हे शेवटचे गाव असलेने फक्त जुने गावठाण येथील प्रमुख गल्ल्यांमध्ये वितरण नलीका आहेत.

२) गावठाण भागात एक सार्वजनिक साधी विहिर आहे. या विहिरीतील पाण्याचा वापर इतर कामांसाठी केला जात असे.

३) गावठाण, मानेनगर, रामनगर, बिरदेववाडी, विठ्ठलवाडी, तांबेमळा, शिवाजीनगर, मेघराजनगर, पाटील मळा या भागात एकूण १६ विंधन विहिरी आहेत. ( हातपंप )

४) शाहूनगर, लक्ष्मीनगर या भागात ३ अश्वशक्ती विजपंपावर चालणाऱ्या २ विंधन विहिरी आहेत. विंधन विहिरींपासून मिळणाऱ्या पाण्याचा वापर पिण्यासाठी केला जात होता पण हे पाणी पुरेसे नव्हते. उन्हाळयाच्या दिवसात हे पाणी वाढत्या लोकसंख्येला पुरत नव्हते.

५)पंचतारांकीत औद्योगिक वसाहतीच्या नळपाणी पुरवठा योजनेतून मानेनगर भागासाठी तात्पुरत्या स्वरुपात पाणी घेण्यात आले आहे."१

## ३.३ रेंदाळ गावची पार्श्वभूमी :

"रेंदाळ हे हातकणंगले तालुक्यातील कोल्हापूर शहरापासून २५ कि.मी. अंतरावर असलेले गाव आहे. रेंदाळचे भौगोलिक क्षेत्र १,३९६ हेक्टर इतके असून, एकूण लोकसंख्या २२,६०० इतकी आहे."२ गावाच्या पूर्वेस महाराष्ट्रातील सुपसिद्ध कापड उद्योगाचे मॅंचेस्टर म्हणून ओळखले जाणारे इंचलकरंजी शहर, पश्चिमेस चांदी व्यवसायासाठी प्रसिद्ध असलेले हुपरी गाव, दक्षिणेस पंचतारांकित औद्योगिक वसाहत, उत्तरेस शेतजमीन अशा चारही बाजूंनी औद्योगिक व कृषी क्रांती, पण गावात पिण्याच्या पाण्याची मात्र तीव्र टंचाई होती. सध्या रेंदाळची लोकसंख्या २२,६०० इतकी आहे. गावात मूळचे ग्रामस्थ संख्येने कमी आहेत पण गावालगत औद्योगिक वसाहत, कारखाना, मोठी शहरे असल्यामुळे

बाहेरुन आलेल्या लोकांची संख्या जास्त आहे. दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत होती पण वाढत्या लोकसंख्येला पुरेशा शुद्ध व स्वच्छ पाण्याची टंचाई होती. गावातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी वाढणाऱ्या लोकसंख्येला शुद्ध व पुरेसा पाणीपुरवठा मिळण्यासाठी रेंदाळने जलस्वराज्य प्रकल्प राबवायचे ठरवले. तसेच प्रकल्प यशस्वी करुन दाखविण्यासाठी विकासाचे विविध उपक्रम राबविले. त्याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला आहे

## ३.४ जलस्वराज्य प्रकल्पातील पाणीपुरवठा सुविधांची माहिती :

जलस्वराज्य प्रकल्प मौजे रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर या गावासाठी ग्राम नळपाणी पुरवठा व स्वच्छता आराखडा तयार करणेच्या दृष्टीने दि. २५/०५/०६ व दि. २६/०५/०६ रोजी करण्यात आलेल्या PRA मध्ये गावफेरी, शिवार फेरी तसेच नागरीकांनी सुचविलेला उद्‌भव यांचा सविस्तर अभ्यास करुन पंचगंगा व दुधगंगा नदीवरुन होणाऱ्या प्रकल्पातील योजनांची ढोबळ अंदाजपत्रके तयार करण्यात आली. प्रकल्पातील लोकसंख्येस भूजल उपलब्ध नसलेने नजीकचा भूपृष्ठीय उद्‌भव घेऊन पा णी पुरवठा योजना करणेस GSDA ने शिफारस केली होती. PRA मधील उद्‌भव वर्गवारी गुणवत्ता तक्त्यानुसार पाण्याची गुणवत्ता, प्रदुषणाची शक्यता यांचा विचार करुन शुद्ध व पुरेशा पा णीपुरवठयासाठी दुधगंगा नदीवरुन योजना तयार करण्याचे PRA च्या ग्रामसभेत सर्वानुमते ठरले.

### अ) जलस्वराज्य प्रकल्पाअतंर्गत योजनेमध्ये समाविष्ट असणाऱ्या उपांगांची बाबवार माहिती :

१) "इंटेक विहिर :- ही विहिर ३.०० मिटर व्यासाची असून बांधकाम आर. सी. सी. आहे. सदरची विहिर दुधगंगा नदी पात्रात आहे.

२) जोड नलीका :- इंटेक विहिरी पासून जॅकवेलपर्यंत ४०० मि. मि. व्यासाची आर. सी. सी. NP-३ दर्जाची ४५ मिटर लांबीची जोड नलिका आहे.

३) जॅकवेल व पंप हाऊस :- दुधगंगा नदीच्या डाव्या तिरावर जॅकवेल आहे. त्याचा व्यास ६ मिटर असून बांधकाम आर. सी. सी. आहे. जॅकलेववर ६ मिटर व्यासाचे पंप हाऊस बांधण्यात आले आहे.

४) अशुद्ध पाणी उपसा सयंत्र :- पंप हाऊसमध्ये ७५ अश्वशक्तीचे दोन डीपवेल टरबाईन पंप बसविले असून या पंपांची पाणी उपसा क्षमता १३,३००० लिटर ताशी असून एकूण कमाल हेड ९० मिटर आहे.

५) अशुद्ध पाणी दाबनलिका :-

जॅकवेलपासून वायू मिश्रण कारंज्यापर्यंत २५० मि. मि. व्यासाची K - ९ दर्जाची D.I. पाईप वापरण्यात आली असून तिची लांबी ७३८० मिटर इतकी आहे.

६) जलशुद्धीकरण केंद्र :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे स्पेसिफिकेशन प्रमाणे ३.२० M.L.D. क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र बांधण्यात आले आहे.

७) शुद्ध पाणी उपसा सयंत्र :- या पंपाद्वारे शुद्ध पाणी उपसा करुन उंच टाकीमध्ये सोडले आहे. यासाठी २० अश्वशक्तीचे दोन सेंट्रीफयुगल मोनोब्लॉक पंप बसविण्यात आले आहेत.

८) उंच साठवण टाकी :-

आर. सी. सी. बांधकामाची उंच साठवण टाकी बांधण्यात आली आहे.तिची क्षमता ६ लाख लिटर इतकी आहे.

९) वितरण व्यवस्था : - वितरण व्यवस्थेमध्ये वितरण नलिका, स्लुईस व्हॉल्व, एअर व्हॉल्व, सार्वजनिक नळकोंडाळे यांचा समावेश आहे. वितरण नलिका ३६,६३५ मिटर लांब आहे."३

## ३.५ रेंदाळमधील जलस्वराज्य प्रकल्प :

जूलै २००५ मध्ये दुसरा टप्प्यासाठी ग्रामपंचायतींकडून अर्ज मागवण्यात आले. जलस्वराज्य प्रकल्पाची माहिती ग्रामपंचायतीला मिळाल्यानंतर सरपंचांनी प्रकल्पात सहभाग घ्यायचा का? हे ठरविण्यासाठी ग्रामसभा घेतली. प्रकल्पाचे उद्देश व नियमांचे वाचन केले. लोकवर्गणी, लोकसहभाग व महिलांचा सहभाग याविषयी माहिती सांगण्यात आली. प्रकल्पातंर्गत विविध टप्प्यांची माहिती जिल्हा चमूने दिली. आजपर्यंतच्या शासकीय योजनांपेक्षा वेगळा असलेला हा प्रकल्प राबवण्याचे गावाने ठरवले. गावाने मागणी अर्ज केला. पण एक कोटीच्या आत गावकृती आराखडा असणाऱ्या गावांचीच निवड करायची व तेथेच प्रकल्प राबवायचा हा सुरवातीचा नियम असल्यामुळे रेंदाळकरांची निराशा झाली. आशेने

अर्ज भरायला गेलेले रेंदाळकर विशेषत: महिला डबडबत्या डोळ्यांनी परत आल्या. शूद्ध व स्वच्छ पाणी हे रेंदाळकरांचे स्वप्न होते. त्यासाठी काय वाट्टेल ते करण्याची त्यांची तयारी होती. सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला मंत्रालयात गेल्या. पाणीपुरवठा विभागाचे तत्कालीन सचिव विश्वास धुमाळ, प्रकल्प व्यवस्थापक संजय देशमुख यांच्यासमोर त्यांनी आपली कैफीयत मांडली. गावात परत आल्यावर १०% लोकवर्गणी जमा करण्यासाठी जोरदार मोहिम राबविली. प्रकल्पाची ध्येयधोरणे, लोकसहभाग याविषयीची जाणीवजागृती कोपरा सभा घेवून केली जावू लागली. रेंदाळकरांच्या या जोरदार हालचाली जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी विकास देशमुख यांनी पाहिल्या. त्यांनी प्रकल्प व्यवस्थापक संजय देशमुख यांच्यासह गावाला भेट दिली. या पहिल्याच आणि अचानक बोलविलेल्या सभेला ४ ते ५ हजार महिला उपस्थित होत्या. त्यांच्या चेहऱ्यावर पाण्यासाठीची तळमळ स्पष्टपणे दिसत होती. बोलण्यातून व्यथा जाणवत होती. प्रकल्प राबविण्याबाबतचा विश्वास कृतीतून दिसत होता. मनातील सच्च्या भावना थेट अधिकाऱ्यांपर्यंत जावून पोहचत होत्या. हे सर्व पाहून, ज्या गावात लोकसहभागाबाबत जागृती आहे, कारभारात पारदर्शकता आहे, नेतृत्व सक्षम आहे, महिलांची उपस्थिती, प्रतिसाद उल्लेखनीय आहे आणि मुख्य म्हणजे पाण्याबाबतची तळमळ खरी आहे, अशा गावाचा गावकृती आराखडा १० कोटींचा जरी असला तरी चालेल असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी प्रवीण दराडे यांनी योजनेसाठी सहमती दिली. उंच साठवण टाकी, जॅकवेल, फिल्टर प्लॅन यासाठी ३२ गुंठे जागा दिली. ३ कोटी ७९ लाखाची योजना ०१/१२/०५ रोजी गावाला मंजूर झाली. प्रथम क्षमता बांधणी धनादेश, अभिनंदन पत्र व जलस्वराज्य प्रकल्पात समाविष्ट झाल्याबद्दल शिल्ड देण्यात आले. त्याचे गावात वाजत स्वागत करण्यात आले व प्रकल्पास सुरवात झाली.

## ३.६ रेंदाळला जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत मंजूर झालेला निधी :

"उपप्रकल्प १ :- ५,१९,४४०

उपप्रकल्प २ :- ३,७९,३६,२६७

उपप्रकल्प ३ :- ४,२३,०००

लोकवर्गणी :- ३८,२२,८९८"[४]

अ) तीन समिती अध्यक्ष / सचिव :

१) पाणीपुरवठा व स्वच्छता समिती :-

अध्यक्ष :- श्री. शिवाजी यशवंत पाटील

सचिव :- सौ. पुष्पांजली महिपती पाटील

इतर १६ सदस्य

२) सामाजिक लेखा समिती :-

अध्यक्ष :- श्री. आण्णासो हरी कोळी

सचिव :- सौ. सुरेखा बाळासो कोथळे

इतर १६ सदस्य

३) महिला विकास समिती :-

अध्यक्ष :- सौ. रंजना कुमार डफळे

सचिव :- सौ. सुनिता सदाशिव माने

इतर १६ सदस्य

४) सहाययकारी संस्था :- क्वॉलिटी मॅनेजमेंट, कोल्हापूर

५) तांत्रिक सेवा पुरवठादार :- संजय पाटील, कोल्हापूर

६) ठेकेदार :- महादेव पाटील, बेळगाव

## ३.७ रेंदाळने जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून राबविलेले उपक्रम :

रेंदाळ गाव आर्थिकदृष्टया समृद्ध असले तरी पिण्याच्या पाण्याची टंचाई मोठया प्रमाणात होती. एकीकडे आर्थिक सुबत्ता तर दुसरीकडे पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष हा रेंदाळसमोरील सर्वात मोठा प्रश्न होता. तो प्रश्न सोडविण्यासाठी कोणत्याही जाचक अटी व नियमांची पूर्तता करण्याची त्यांची तयारी होती. आत्तापर्यंत रेंदाळने अनेक शासकीय योजना राबविल्या. त्यामध्ये सरपंच व ग्रामसेवक यांचाच सहभाग होता. परंतु जलस्वराज्य प्रकल्पात लोकसहभाग महत्वाचा असल्याने ग्रामसभा, समिती सभा, लोकवर्गणी याद्वारे लोकसहभाग मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला. यासाठी पुढील उपक्रम राबविण्यात आले :-

## अ) लोकसहभागासाठी राबविलेले उपक्रम :-

**१)जनजागृती मोहिम :-**

रेंदाळमध्ये बहुतांश कुटुंबे ही पाटलांची आहेत. घरदांजपणा व पारंपारिक वातावरणामुळे महिला हळदी कुंकु, लग्नसमारंभ यासारख्या कार्यक्रमालाच एकत्र येत. जलस्वराज्य प्रकल्पामध्ये सर्व ठिकाणी महिलांच्या सहभागाला महत्व आहे. ग्रामपंचायतीमध्ये येऊन यापूर्वी महिलांनी विकासकामांबाबत कधीच चर्चा केली नव्हती. त्यामुळे महिलांचा सहभाग मिळवायचा कसा हा खरा प्रश्न होता. यासाठी पदाधिका-यांनी महिलांच्या भावनेला हात घालण्याचे ठरविले. कुंकु झाले वैरी हा मराठी प्रबोधनात्मक चित्रपट महिलांना दाखविण्यात आला. चित्रपटाची नायिका पल्लवी सुभाष हिच्या मार्फत गावात जनजागृती केली. जलस्वराज्य प्रकल्पात सहभागी होण्याबाबत आवाहन करण्यात आले. यानंतर झ् ालेल्या प्रत्येक ग्रामसभेत व कार्यक्रमात पुरुषांपेक्षा महिलांचा सहभाग जास्त राहिला.

**१) महिला व सर्वसाधारण ग्रामसभांचे आयोजन :-**

जलस्वराज्य प्रकल्पाची पहिला ग्रामसभा दि. ३१/०१/०६ रोजी घेण्यात आली. प्रकल्प राबविण्यासाठी मंजूरी देवून आराखडा तयार करण्यात आला. उपप्रकल्प १,२,३ चे आराखडे तयार करणे, समित्यांची स्थापना, तांत्रिक सेवा पुरवठादार, ठेकेदार, सहाययकारी संस्थेची निवड, पाणी पुरवठा उपांगांना मान्यता, निधी मागणी ठराव, बचतगटांची स्थापना, बिजभांडवल वाटप, वसूली, पाणीपुरवठा दरास मंजूरी, खर्चास मंजूरी यासारखे अनेक ठराव ७५% पेक्षा जास्त उपस्थिती असलेल्या ग्रामसभेत घेण्यात आले. आत्तापर्यंत एकूण १६ महिला व सर्वसाधारण ग्रामसभा घेण्यात आल्या. कोणतीही ग्रामसभा कोरमअभावी रद्द करावी लागली नाही.

**३)समिती सभा :-**

ग्रामसभेत समित्यांची स्थापना झाल्यानंतर ग्रामसभेसमोर मांडले जाणारे सर्व विषय प्रथम समितीच्या बैठकीत मांडून समित्यांची मंजूरी घेण्यात आली. ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, सामाजिक लेखा समिती, महिला विकास समिती या प्रत्येक समितीत प्रत्येकी १८ सदस्य आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती व सामाजिक लेखा समितीत ५० टक्के महिला असून महिला विकास

समिती संपूर्ण महिलांची आहे. आत्तापर्यंत एकूण २३ समिती सभा झाल्या त्यामध्ये सरासरी ९०% उपस्थिती आहे.

**४) कोपरा सभांचे आयोजन :-**

महिला ग्रामसभा व सर्वसाधारण ग्रामसभेचे आयोजन तीन महिन्यातून एकदा करण्यात येते. आवश्यकता वाटल्यास महिन्यातून एकदा महिला व सर्वसाधारण ग्रामसभेचे आयोजन करणे हा जलस्वराज्य प्रकल्पाचा नियम आहे. रेंदाळ गावचा भौगोलिक विस्तार मोठा आहे. लोकसंख्या जास्त आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीपर्यंत संदेश पोहचावा, त्यांना विकास प्रक्रियेत सामिल होता यावे यासाठी कोपरा सभांचे आयोजन करण्यात आले. गावातील गल्ल्या, प्रभाग येथे जावून लोकवर्गणी, निर्मलग्राम, लोकसहभाग, बचतगटांची स्थापना, पाणीपट्टी वसूली याबाबत लोकांना मार्गदर्शन करण्यात आले. जलस्वराज्य प्रकल्पाचे महत्व पटवून देण्यात आले. गुणवत्तापूर्ण कामासाठी व पारदर्शक कारभारासाठी लोकसहभाग आवश्यक असल्याचे सांगून प्रत्येक व्यक्तीने प्रकल्पाच्या कामकाजावर लक्ष ठेवावे, त्रुटी असल्यास निदर्शनास आणून द्याव्यात असे सांगण्यात आले.

**५) निवृत्त शिक्षक, सरकारी नोकर यांचे योगदान :-**

गावातील निवृत्त शिक्षकांची टिम तयार करुन त्यांचा उपयोग प्रकल्पाच्या जाणीवजागृतीसाठी केला. लोकवर्गणी , निर्मलग्राम, गरोदर माता, बचतगटातील महिला, कुपोषित बालके यासंदर्भात त्यांनी सर्व्हे केला. कोपरा सभा घेऊन लोकांना मार्गदर्शन केले. ज्ञानदानाबरोबरच समाजसेवा करुन निवृत्तीनंतरच्या मोकळ्या वेळेचा सदुपयाग करण्याची संधी जलस्वराज्य प्रकल्पामुळे त्यांना प्राप्त झाली.

**६) लोकवर्गणी : -**

“रेंदाळच्या पाणीपुरवठा व स्वच्छता आराखडयाची एकूण रक्कम ३,७९,३६,२६७ आहे . १०% लोकवर्गणीच्या रुपात ३८,२२,८९८ रु. भरणे गावाला आवश्यक होते. यापैकी ५% रक्कम जमा केल्यानंतरच प्रकल्पाचा पहिला हप्ता गावाला प्राप्त होतो.”५ लोकवर्गणी भरण्यामागचा शासनाचा उद्देश लोकांना स्पष्ट करुन सांगण्यात आला. कोपरा सभा, गृहभेटी, मौखिक संवाद, परस्पर भेटी या माध्यमातून लोकवर्गणीसाठी प्रयत्न करण्यात आले. रेंदाळची कुटुंबसंख्या २९०० इतकी आहे. घरटी १,००० रु. प्रमाणे लोकवर्गणी गोळा करण्यात आली. लोकवर्गणी देणाऱ्या लोकांची नावे

ग्रामपंचायतीसमोर फलकावर लावून त्यांचे आभार मानण्यात आले, अभिनंदन करण्यात आले. त्यामुळे प्रकल्पात आपण वाटा उचलला आहे याची लोकांना जाणीव झाली. त्यातून स्वमालकीची भावना वाढत गेली. दि. २४/०२/०८ रोजी रेंदाळने १० टक्के लोकवर्गणी पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र जिल्हा परिषदेस सादर केले.

**७) प्रशिक्षण कार्यक्रम :-**

ग्रामस्थांची क्षमता बांधणी, लोकसहभाग, जनजागृती, मतपरिवर्तन यासाठी उपप्रकल्प १ अंतर्गत उद्देश, नियम कार्यप्रणाली, गाव सहभागी मुल्यांकन, बचत गटांना चालना देणे, स्थानिक मंडळे, संस्था मार्गदर्शन, तीन समिती प्रशिक्षण, गवंडी प्रशिक्षण, आर्थिक अहवाल लिखाण, किशोरी मार्गदर्शन कार्यशाळा, लिंग समभाव सचेतना, बचतगट रेकॉर्ड लिखाण, अभ्यास सहल, नेतृत्व विकास, प्रासंगिक सण, उत्सव स्पर्धा, विविध उद्योगांची माहिती, पंचायतराज अशी एकूण १५ प्रशिक्षणे घेण्यात आली. या प्रशिक्षणांच्या माध्यमातून जनजागृती व क्षमता बांधणीचे काम मोठया प्रमाणात झाले. जलस्वराज्य प्रकल्प हा आपल्या विकासासाठी आहे हे समजले. समूहशक्तीतून चांगली कामे आकाराला येतील हा विश्वास ग्रामस्थांमध्ये निर्माण झाला. जिल्हा चमू, सहाय्यकारी संस्था, तज्ञ मार्गदर्शक यांनी जलस्वराज्य प्रकल्पाचे उद्देश प्रशिक्षणाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचवले. प्रशिक्षणांच्या कार्यक्रमामुळे लोकसहभाग वाढत गेला.

## ब) विकासासाठी राबविलेले उपक्रम :-

गावांचे संघटन, गावाच्या विकासासाठी एकत्रितपणे विचार करण्याची कल्पना, विचारातून कृतीकडे जाण्याचा मार्ग आणि कृतीतून गावाच्या विकासाचे स्वप्न साकार करण्याची मानसिकता, गावामध्ये घडवून आणण्याचे काम जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून शासनाला करावयाचे होते. शासनाचे हे विकासाचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी रेंदाळने विकासाचे पुढील उपक्रम राबविले :-

**१) पाणीपुरवठा योजना :-**

शुद्ध व स्वच्छ पाणी मिळविणे हे रेंदाळकरांचे स्वप्न होते. ते साकार करण्यासाठी त्यांनी सुरवातीपासून परिश्रम घेतले. शासनाने योजना नाकारल्यानंतर मंत्रालयापर्यंत जाऊन त्यांनी आपल्या गावातील

पाण्याच्या तीव्र टंचाईचे चित्र पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांसमोर स्पष्ट केले. दि.०१/१२/०५ रोजी गावाला ३,७९,३६,२६७ रुपयांचा प्रकल्प मंजूर झाल्यानंतर शासनाचे नियम व निकषांप्रमाणे प्रकल्प राबविण्यास सुरवात केली. "दि. २५/११/०७ रोजी योजनेतून पाणी पडले. दि. १०/०७/०८ पासून गावात नियमित पाणीपुरवठा सुरु झाला आहे."६

**२) स्वच्छता सुविधा :-**

"रेंदाळचा स्वच्छता आराखडा एकूण २,९२,७१७ इतक्या रकमेचा होता. त्यातून ५०० मिटर लांबीची गटर्स व एकूण १५ शोषखड्डे बांधायचे होते. लोकवर्गणीच्या स्वरुपात ५८,५४३ रु. भरणे आवश्यक होते."७ स्वच्छता आराखडयातील मंजूर करण्यात आलेली सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. त्यामुळे सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन होऊन रोगराई, घाण व दुर्गंधीला काही प्रमाणात आळा बसला आहे. स्वच्छता आराखडयातून संपूर्ण गावासाठी स्वच्छता सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत.

**३)निर्मलग्राम मोहिम :-**

"केंद्र शासनाने २००४ साली निर्मलग्राम पुरस्कार योजना सुरु केली आहे. महाराष्ट्र शासनाने २००० सालापासून निर्मलसाठी प्रयत्न केलेले आहेत."८ जलस्वराज्य प्रकल्प गावात सुरु होण्यापूर्वी रेंदाळमध्ये १५ टक्के लोकांच्या घरी वैयक्तिक शौचालये होती. त्यामुळे गावात घाण, दुर्गंधी यांचे साम्राज्य होते. प्रकल्प राबविणाऱ्या गावांना १०० टक्के निर्मलग्रामचे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय उपप्रकल्प २ च्या दुसऱ्या हप्त्याचा निधी मिळत नाही. त्यामुळे रेंदाळने निर्मलग्रामसाठी विशेष प्रयत्न केले. २२,६०० इतकी प्रचंड लोकसंख्या असलेल्या गावाला निर्मल करणे हे प्रकल्पाच्या पदाधिकाऱ्यांसमोरचे मोठे आव्हान होते. बऱ्याच लोकांची पैसा, जागा यासारख्या प्राथमिक गोष्टींची अडचण होती. या अडचणी दुर करणे, लोकांची मानसिकता बदलून त्यांना घरात शौचालय बांधण्यास तयार करणे हे एक आव्हान होते. जलस्वराज्य प्रकल्पाच्या नियमानुसार निर्मलची मोहिम राबवायची हे ठरल्यानंतर प्रथम सरकारी अधिकारी, पोलिस यांची मदत घेऊन गुडमॉर्निंग पथक तयार करण्यात आले. प्रात:विधीसाठी उघडयावर जाणाऱ्या लोकांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला, काही लोकांना पोलिसांनी तुरुंगात टाकले, १२०० रु. दंड केला. कोणतेही पदाधिकारी त्यांना सोडवण्यासाठी गेले नाहीत. जागेची उपलब्धता नसणाऱ्या चार पाच कुटुंबांना एकत्र शौचालय बांधण्यास व वापरण्यास सांगितले. गरीब लोकांना

शौचालयाचे भांडे व चौकट ग्रामपंचायतीमार्फत मोफत पुरविण्यात आली. हुपरी येथील आर्टस्, कॉमर्स व सायन्स महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मुलांनी शोषखड्डे काढून दिले. ग्रामस्थांचे स्वच्छतेबाबत प्रबोधन केले, मतपरिवर्तन केले. दि. १२/०५/०८ रोजी निर्मलग्राम केंद्रीय मूल्यमापन समितीने रेंदाळला भेट देवून पाहणी केली. या सर्व गोष्टींचा परिणाम गाव १०० टक्के निर्मल होण्यात झाले आहे.

**४) पाणीपट्टी वसूली :-**

जलस्वराज्य प्रकल्पातून करावयाची पाणीपुरवठा, स्वच्छता व महिला सक्षमीकरणाची सर्व कामे पूर्ण झ्ााल्यानंतर योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यापूर्वी सहा महिन्याची आगाऊ पाणपट्टी जमा करावी लागते. त्याशिवाय गावात बर्हिगमन प्रक्रिया राबविता येत नाही. शासनाने ग्रामीण भागातील पाणीपुरवठयासाठी ज्या योजना राबवल्या त्यापैकी बहुतांशी योजना लोकांनी पाणीपट्टी जमा न केल्यामुळे व त्यामुळे ग्रामपंचायतीला देखभाल दुरुस्तीचा खर्च भागवता न आल्यामुळे बंद पडल्या. इतर योजनांप्रमाणे जलस्वराज्य प्रकल्पाचे होऊ नये यासाठी आगाऊ पाणीपट्टी वसूल केली जाते. रेंदाळची थकबाकी ४६ लाख इतकी होती. पुन्हा आगाऊ पाणीट्टीच्या स्वरुपात ७,५६,९९२ रुपये जमा करणे आवश्यक होते. पदाधिकारी, ग्रामसेवक यांनी ग्रामसभा, कोपरा सभा घेऊन पाणीपट्टीचे महत्व सांगितले. पाणीपट्टी जमा केल्याशिवाय वैयक्तिक नळ कनेक्शन दिले जाणार नाही असा ग्रामसभेत ठराव घेतला. त्याची काटेकोर अमंलबजावणी केली. सध्या ३७ लाख थकबाकी वसूल झाली आहे. एकूण कुटूंबसंख्या २९०० इतकी आहे. त्यापैकी २१०० कुटुंबांना वैयक्तिक नळ कनेक्शन्स देण्यात आली आहेत.उर्वरित कुटुंबांना कनेक्शन देण्याचे काम सुरु आहे. गावात नियमित पाणीपुरवठा सुरु आहे

**६) मिटरपद्धतीचा वापर :-**

रेंदाळ हे गाव लोकसंख्येने मोठे असल्यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर, पाणीपुरवठा योजनेचे योग्य नियोजन व व्यवस्थापन, देखभाल दुरुस्तीचा खर्च आटोक्यात रहावा यासाठी मिटर पद्धतीचा अवलंब करण्याबाबत ग्रामस्थांना जिल्हा चमूकडून वारंवार मार्गदर्शन करण्यात आले. मिटर पद्धतीचे फायदे अभ्यासण्यासाठी ग्रा.पं.मिणचे खुर्द, ता. भुदरगड, जि.कोल्हापूर येथे ग्रामपंचायत सदस्य, समिती सदस्य व काही ग्रामस्थांनी भेट दिली. सुरवातीला मिटरपद्धतीला काही ग्रामस्थांनी विरोध केला. तेव्हा



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

मिटर पद्धतीमुळे पाण्याचा वापर कमी होतो, गावात स्वच्छता राहते, विज कमी लागते, १०० टक्के पाणीट्टी वसूली होते हे पटवून सांगण्यात आले. प्रत्येक कुटुंबाने मिटर बसविलेच पाहिजे असा ग्रामसभेत ठराव केला. मिटर पद्धतीचे फायदे लक्षात घेऊन पुढे गावकऱ्यांनी मिटर पद्धतीचे स्वागत केले. आजअखेर एकूण १८५० मिटर बसविण्यात आली आहेत. उर्वरित कनेक्शन्सना मिटर बसविण्याचे काम सुरु आहे.

## क) महिला सक्षमीकरणासाठी राबविलेले उपक्रम :-

"महिलांचे सक्षमीकरण करणे हे जलस्वराज्य प्रकल्पाचे एक उद्दीष्ट आहे. महिलांचा सहभाग मिळविण्यासाठी सर्वसाधारण ग्रामसभेबरोबर महिलांची स्वतंत्र ग्रामसभा हे या प्रकल्पाचे वैशिष्टय आहे. जलस्वराज्यच्या माध्यमातून आज महाराष्ट्रातील अनेक गावात महिलांनी घराचा ऊंबरठा ओलांडून ग्रामसभांमध्ये सहभाग घेतला आहे. गावाच्या प्रश्नाबरोबरच प्रकल्पाचा हिशेब विचारला आहे. महिलांना त्यांच्या कौशल्यांची, नेतृत्व गुणांची आणि निर्णय क्षमतेची जाणीव प्रकल्पाच्या माध्यमातून करुन देण्यात आली आहे. महिलांचे एकत्रीकरण करुन त्यांचे बचतगट स्थापन करुन गावाला पर्यायी अर्थव्यवस्था मिळवून दिली आहे."९ रेंदाळने महिला सक्षमीकरणासाठी पुढील उपक्रम राबविले आहेत :-

**१) प्रशिक्षण कार्यक्रम :-**

"उपप्रकल्प ३ म्हणजे महिला सक्षमीकरणांतर्गत महिलांच्या विकासासाठी अभ्यासदौरा, महिला कायदेविषयक प्रशिक्षण, विविध शासकीय योजनांची माहिती, व्यवसाय प्रशिक्षण - फॅशन डिझायनिंग, कुकिंग व कॅटरिंग प्रशिक्षण, ब्युटी पार्लर प्रशिक्षण, रेक्झीन बॅग प्रशिक्षण, ज्वेलरी प्रशिक्षण, बचतगट संघ महासंघ प्रशिक्षण, महिला मेळावा यासारखी प्रशिक्षणे देण्यात आली."१० आरोग्यविषयक कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. अभ्यासदौऱ्यामुळे विविध उद्योग व्यवसायांची माहिती महिलांना मिळाली, प्रशिक्षण कार्यक्रमादरम्यान विचारांचे आदान प्रदान झाले. गावात राबवायच्या विकासकामांबाबत चर्चा झाल्या. स्पर्धा कार्यक्रमादरम्यान महिलांच्या सुप्त गुणांना व मुलभूत

16122

कौशल्यांना वाव मिळाला. प्रशिक्षणांच्या माध्यमातून देण्यात आलेल्या माहितीचा, ज्ञानाचा व मार्गदर्शनाचा उपयोग महिलांनी आपल्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी करुन घेतला.

**२) बचतगटांची स्थापना :-**

रेंदाळमध्ये जलस्वराज्य प्रकल्प सुरु होण्यापूर्वी १८ बचतगट होते. महिला सक्षनीकरणासंदर्भात बोलले जात असताना अपरिहार्यपणे बचतगटांचा संदर्भ येतो. बचतगटांच्या चळवळीने महिलांचे सामाजिक व राजकीय स्थान उंचावले आहे. त्यामुळे उपप्रकल्प ३ अंतर्गत महिलांना बचतगटात सामावून घेण्यासाठी प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले. बचतगट संघ महासंघ, बचतगट रेकॉर्ड लिखाण इ. संदर्भात माहिती दिली. बचतगट म्हणजे काय, बचतगटाचे उद्देश, फायदे पटवून देण्यात आले. गावातील गरीब, गरजू, विधवा, परित्यक्त्या, घटस्फोटीत महिलांना बचतगटांमध्ये सहभागी करुन घेण्यात आले. सध्या रेंदाळमध्ये २६० बचतगट असून त्यामध्ये ३२०० महिला सहभागी झाल्या आहेत. दि. ३१/१२/०८ रोजी झालेल्या ग्रामसभेत गावात दोन महासंघ तयार करण्याचे ठरले आहे. त्याचे काम पूर्णत्वाच्या पातळीवर आहे.

**३) बिजभांडवल वाटप व उद्योग व्यवसायांची उभारणी :-**

जलस्वराज्य प्रकल्पातून महिलांना कौशल्य व व्यवसाय प्रशिक्षण दिल्यानंतर गरीब व गरजू महिलांना बिजभांडवल वाटप करण्यात येते. बिजभांडवल वाटप व उद्योग व्यवसायाची उभारणी यापाठीमागे महिलांचे आार्थिक स्वावलंबन हा मुख्य हेतू आहे. रेंदाळचा महिला सक्षमीरणाचा आराखडा एकूण ४,२३,००० इतका आहे. त्यातून १,८०,००० रु. प्रशिक्षणांवर खर्च करण्यात आले. २,४३,००० इतकी रक्कम ५० लाभार्थींना बिजभांडवल म्हणून मासिक १% व्याजदराने वितरीत करण्यात आली. बिजभांडवलाची परतफेड वेळच्या वेळी होत असलेने आत्तापर्यंत ४,२५००० रु. बिजभांडवल वाटप करण्यात आले आहे. एकूण ८५ लाभार्थींनी बिजभांडवलाचा लाभ घेऊन व्यवसाय सुरु केले आहेत. त्यामध्ये चांदी व्यवसाय, शेळीपालन, दुग्धव्यवसाय, शिलाई काम, बेकरी प्रॉडक्ट, रेक्झीन बॅग तयार करणे, बांगडी व्यवसाय, लेडीज शॉपी यासारख्या व्यवसायांचा समावेश आहे.

**४) संगणक प्रशिक्षण :-**

रेंदाळच्या दक्षिणेस पंचतारांकित औद्योगिक वसाहत आहे. तेथे महिलांना मोठया प्रमाणात रोजागाराच्या संधी उपलब्ध होत्या. परंतु संगणक साक्षरता ही नोकरी मिळवण्याची आर्हता होती. रेंदाळमधील महिलांमध्ये संगणक साक्षरतेचा अभाव होता. महिलांना मिळणारी नोकरीची संधी गमवावी लागू नये तसेच कमीत कमी खर्चात महिला संगणक साक्षर व्हाव्यात यासाठी Success Human Value And Lifestyle Education, Society या इंचलकरंजी, जि. कोल्हापूर येथील संगणक प्रशिक्षण संस्थेबरोबर प्रकल्पाचे अध्यक्ष शिवाजी पाटील यांनी करार केला. ४०० महिला व मुलांनी ११०० रुपयांमध्ये ९ महिने संगणक प्रशिक्षण घेतले. सदर प्रशिक्षणामुळे १०० महिलांना मासिक २५०० रु. वेतनाचा रोजगार प्राप्त झाला आहे.

**५) गारमेंट प्रशिक्षण :-**

रेंदाळमध्ये चांदी व हातमाग व्यवसाय हे प्रमुख दोन व्यवसाय आहेत. रुई, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे सुरेश पाटील या व्यावसायिकाने गारमेंट पार्क उभारला आहे. या पार्कमध्ये गरीब महिलांना मोफत गारमेंट प्रशिक्षण मिळवून देण्याचे काम जलस्वराज्य प्रकल्पातंर्गत करण्यात आले. प्रशिक्षण घेतलेल्या महिलांना गारमेंट पार्कमध्येच रोज ६० रु. वेतनाचा रोजगार प्राप्त झाला आहे.

**६)सॅनिटरी नॅपकिन प्रकल्प:-**

महाराष्ट्रात जलस्वराज्य प्रकल्पात समाविष्ट असलेल्या गावांपैकी १४ गावातील १४ दारिद्रय रेषेखालील महिलांना दि. २८/०१/०९ ते दि. ०१/०२/०९ या कालावधीत त्रिची, तमिळनाडू येथील वूमन या सेवाभावी संस्थेत सॅनिटरी नॅपकिन तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. १४ महिलांमध्ये रेंदाळ येथील राधाकृष्ण महिला बचतगटाच्या सौ. शुभांगी करडे यांची निवड करण्यात आली होती. प्रशिक्षण घेऊन परत आल्यानंतर राज्य व जिल्हा स्तरावरील स्त्री पुरुष समानतातज्ञांनी सदर प्रकल्प गावात सुरु करण्याबाबत दि. ३१/०३/०९ रोजी महिलांची बैठक आयोजित केली. महिलांचे आरोग्य व कायमस्वरुपी व्यवसाय यादृष्टीने सॅनिटरी नॅपकिन व्यवसायाचे महत्व सांगण्यात आले. त्यानंतर गावातील २० महिलांनी सॅनिटरी नॅपकिन तयार करण्याचा व्यवसाय करण्यासंदर्भात सहमती दर्शविली. त्यांनी बचतगटातील महिला, शाळा, महाविद्यालये, मेडिकल स्टोअर्स, सरकारी दवाखाने येथे जाऊन माहिती दिली. सॅनिटरी नॅपकिन्ससाठी उपलब्ध बाजारपेठेचे सर्व्हेक्षण केले व व्यवसाय करण्याचे

निश्चित केले. व्यवसायासाठी आवश्यक असणारा कच्चा माल, तंत्रज्ञान, जागा खरेदी करुन उत्पादन सुरुकेले आहे. सदर व्यवसायासाठी अंदाजे २,५०,००० रु. भांडवलाची गुंतवणूक करण्यात आली आहे.

**७) पाणीट्टी वसूलीचे काम बचतगटांकडे :-**

"घरातील पाण्याच्या संदर्भातील सर्व कामे महिला करतात. गावातील पाणीपुरवठा योजना जर महिलांच्या ताब्यात दिली तर ती योजना शाश्वत चालेल हे सरकारच्या लक्षात आल्यानंतर शासनाने दि. ७ जून २००८ रोजी क्र.ग्रापाधो ११०८/प्र.क्र.६६/पापु०७ या क्रमांकाचे शासन परिपत्रक काढले. सदर परीपत्रकानुसार पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीचे काम बचतगटांकडे सोपविण्याबाबतचा अध्यादेश काढला."[११] जिल्हा स्तरावरुन त्याची प्रत प्रकल्प कार्यालयात मिळाल्यानंतर ग्रामसभेत त्याचे वाचन करण्यात आले. गावातील काही महिलांनी अध्यक्षांशी संपर्क साधून देखभाल दुरुस्तीचे नाही पण पाणीपट्टी वसूलीचे काम करण्यास तयारी असल्याचे सांगितले. त्या महिलांची कार्यक्षमता, गावचा विस्तार यांचा विचार करुन सुशिक्षित, कार्यक्षम महिलांचा महासंघ तयार करुन पाणीपट्टी वसूलीचे काम सदर महासंघाकडे देण्याचे दि. ३१/१२/०८ या ग्रामसभेत ठरविण्यात आले आहे.

## ३.८ रेंदाळने राबविलेल्या उपक्रमांचे फायदे :

रेंदाळने जलस्वराज्य प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यासाठी लोकसहभाग, विकास व महिला सक्षमीरणावर आधारीत उपक्रम राबविले या उपक्रमांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे :

१) जलस्वराज्य प्रकल्प मागणी आधारीत प्रकल्प आहे. त्यामध्ये लोकांचा सक्रिय सहभाग महत्वाचा आहे. पारंपारिक वातारवरणातून लोकांना बाहेर काढून त्यांच्यापर्यंत विकासाचा संदेश पोहचविण्यासाठी महिला ग्रामसभा, सर्वसाधारण ग्रामसभा, समिती सभा, कोपरा सभा यांचे नियमित आयोजन करण्यात आले. त्याचा परिणाम लोकसहभाग वाढण्यात

झाला. जलस्वराज्य प्रकल्पाची ध्येय धोरणे लोकांपर्यंत पोहचविणे शक्य झाले. पुढील सारणीवरुन लोकसहभागाचे चित्र लक्षात येईल.

**सारणी क्र. ( अ -१ )**

| अ. क्र. | एकूण महिला ग्रामसभा | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | १६ - २६/०१/०९ अखेर | १४५ | सरासरी ७४% |

सारणी क्र. ( अ -२)

| अ. क्र. | एकूण सर्वसाधारण ग्रामसभा | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | १६ - २६/०१/०९ अखेर | १४५ | सरासरी ६२% |

सारणी क्र. ( अ -३ )

| अ. क्र. | एकूण तीन समिती सभा | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | ३३ | २१० | सरासरी ९०% |

२) लोकवर्गणीच्या स्वरुपात रेंदाळला ३८,२२,८९८ रु. भरायचे होते. घरटी लोकवर्गणी रु. १,००० इतकी ठरविण्यात आली होती. लोकर्वणीतून लोकांच्यात स्वमालकीची भावना निर्माण झाल्यामुळे लोकवर्गणीची इतकी मोठी रक्कम भरणे व जलस्वराज्य प्रकल्प राबविणे गावाला शक्य झाले.

३) जनजागृती मोहिम राबविताना योग्य नियोजन करण्यात आले. चित्रपट अभिनेत्री, अधिकारी, पदाधिकारी यांचा जनमतावर असणारा पगडा लक्षात घेऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली चर्चा, बैठका, मेळावे यांचे आयोजन करण्यात आले. त्याचा परिणाम लोकसहभाग वाढ व लोकांची विकास कामातील सक्रियता वाढण्यात झाला.

४) ३,७९,३६,२६७ रु. च्या नळपाणीपुरवठा योजनेच्या पाणीपट्टी वसूलीचे काम बचतगटांकडे देण्यात आले आहे यावरुन महिला सक्षम झाल्याचे दिसते.

५) जलस्वराज्य प्रकल्प राबविण्यापूर्वी वैयक्तिक शौचालये असणाऱ्या कुटुंबांची संख्या १५% इतकी होती. प्रकल्पाच्या पूर्णत्वापूर्वी गाव १००% निर्मल झाले आहे. जलस्वराज्य प्रकल्पाचे अधिकारी व इतर यंत्रणा गावात स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात यशस्वी झाले आहेत.

६)मिटरपद्धतीच्या वापरामुळे पाण्याचे योग्य नियोजन व व्यवस्थापन होते. मिटरपद्धतीचा अवलंब करण्याबाबत काही लोकांचा विरोध होता पण ग्रामसभेत मताधिक्याने मिटरचा वापर करण्याबाबतचा ठराव समंत करण्यात आला. यावरुन लोकांमध्ये जागृती झाली आहे, पाण्याचे महत्व समजले आहे हे लक्षात येते. देखभाल दुरुस्तीच्या खर्चाच्या दृष्टीने योजना परवडणारी झाली आहे.

७)बचतगटांची १८ वरुन २६० इतकी वाढलेली संख्या, महिलांनी सुरु केलेले उद्योग व्यवसाय, योजनेतील त्यांचा सक्रिय सहभाग, सॅनिटरी नॅपकिन सारखा व्यवसाय सुरु करण्याबाबत त्यांनी केलेले प्रयत्न यावरुन रेंदाळने प्रकल्पाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी राबविलेले उपक्रम उपयुक्त ठरले आहेत हे लक्षात येते.

## ३.९ समारोप :

रेंदाळ गावात जलस्वराज्य प्रकल्पातंर्गत मंजूर झालेली नळपाणीपुरवठा योजना राबविताना योजनेचे काम गुणवत्तेच व्हावे, जलस्वराज्य प्रकल्पाची सर्व उद्दीष्टये पूर्ण व्हावीत यासाठी दि. ०१/०१२/०५ रोजी झालेल्या पहिल्या ग्रामसभेपासून प्रयत्न करण्यात आले. लोकसहभाग, महिलांचे सक्षमीकरण आणि त्यातून गावाचा विकास या गोष्टी फक्त कागदावर न राहता प्रत्यक्ष साकारण्यासाठी समूहशक्तीतून प्रयत्न करण्यात आले. त्यासाठी विविध कार्यक्रम, प्रशिक्षण, चर्चा, बैठका, मेळावे यांचे आयोजन करण्यात आले. अशा कार्यक्रमांमुळे लोकांमध्ये स्वमालकीची व जबाबदारीची भावना निर्माण होण्यास मदत झाली. त्यातून विकासाचा प्रकल्प लोकसहभागातून यशस्वीपणे राबविणे शक्य झाले.

# संदर्भसूची

१. पाटील संजय- तांत्रिक सेवा पुरवठादार, रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचेशी चर्चा, दि. ०९/११/०८

२. आर.एस.भोजे - ग्रामसेवक रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचेकडून दि. ११/०९/०८ रोजी घेतलेली माहिती

३. पाटील संजय- तांत्रिक सेवा पुरवठादार, रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचेशी चर्चा, दि. ०९/११/०८

४. लेखा शाखा, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, कोल्हापूर

५. मंजूर गावकृती आराखडा, रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, दि. ३०/०६/०६

६. Monthly Progress Report, Jalswarajya Project, Zilla Prishad, Kolhapur , Dec.2007 & August 2008

७. मंजूर गावकृती आराखडा, रेंदाळ, दि. ३०/०६/०६

८. अजित पवार, जलसंपदा, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग मंत्री यांची मुलाखत, महाराष्ट्राची निर्मलतेकडे वाटचाल - लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयमुंबई, नोव्हेंबर २००८ , पान क्रं. १६

९. अजय जाधव- जलस्वराज्य एक विचार - लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई, डिसेंबर २००७, पान नं. २४, २५

१०. महिला सक्षमीरणासाठी उपप्रकल्प ३ अंतर्गत घेण्यात आलेल्या प्रशिक्षणांचे अहवाल, रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

११. शासन अध्यादेश / परिपत्रक, क्र. दि